# गरुड झेप

www.janatabankpune.com

जून-जुलै २०१४ (जनता सहकारी बँक लि., पुणे द्वारा प्रकाशित गृहपत्रिका : केवळ खाजगी वितरणासाठी)

## अध्यक्षांचे लेखणीतून,



चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीमध्ये आपण प्रवेश करून दीड महिना उलटला आहे. गेल्या वर्षीचा ताळेबंद व नफातोटा पत्रक व त्यांचे लेखापरिक्षणाचे काम पूर्ण झाले. सदरचा ताळेबंद व नफातोटा पत्रक वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूर केले आहे. त्याच बरोबर या साध्य केलेल्या उद्दिष्टांचे विश्लेषण शाखाव्यवस्थापक परिषदेत केले व चालू आर्थिक वर्षासाठीची उद्दिष्टे निश्चित केली. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात आपला एकत्रित व्यवसाय रू. १२,००० कोटी व्हावा असे ठरवले .

या उद्दिष्टांकडे झेपावण्यासाठी सध्याची वेळ योग्य आहे. या वर्षी आपण आपल्या नियोजनामध्ये काही बदल केलेला आहे. आर्थिक उद्दिष्टांबरोबरच दर्जात्मक सुधारणा हे आपले उद्दिष्ट आहे. त्यादृष्टीने सिंहावलोकन करून आपल्या कार्यपध्दतीत आवश्यक त्या सुधारणा करणे व एक सक्षम बँक होणे हे आपले उद्दिष्ट आहे. एकूण ठेवींमधील बचत व चालू खात्यामधील ठेवींचे प्रमाण वाढावे यादृष्टीने प्रयत्नांची नितांत आवश्यकता आहे. ठेवींवर द्यावे लागणारे व्याज हा बँकेला करावा लागणारा सगळ्यात मोठा खर्च असतो. हा खर्च कमी करणे नफा वृध्दीसाठी आवश्यक आहे. बचत व चालू ठेव खात्यांच्या घसरणीचे प्रमाण रोखणे व सदर ठेवींचे प्रमाण वाढवणे हे प्राधान्याने करावयाचे काम आहे. त्यासाठी सामाजिक संपर्क वाढवणे, संबंधातून खाती मिळविणे, बचत व चालू ठेवींसाठी अभियान करणे, घरोघरी जाऊन माहिती देणे, स्थानिक गरजांप्रमाणे आपल्या योजनांमध्ये आवश्यक ते बदल करणे, ग्राहक सेवा सुधारणे, बँकेची प्रतिमा सुधारण्यासाठी प्रयत्न करणे, ग्राहकांसाठी संमेलने आयोजित करणे अशा अनेक प्रकारे प्रयत्न करता येतील. या संदर्भात आपणाकडून येणाऱ्या विविध मौलिक सूचनांचा नक्कीच विचार केला जाईल. तरी आपण याबाबत सूचना जरूर कराव्यात.

आपल्याकडील कर्ज वृद्धी ही सर्वसाधारणपणे दुसऱ्या सहामाहीत वाढते याचा आपल्या नफा क्षमतेवर व रोखतेवर परिणाम होतो. त्यादृष्टीने एकजिनसी व सातत्याने वाढ व्हावी असा प्रयत्न आवश्यक आहे.

थकीत कर्ज वसुली बाबत आपण समाधानी राहून चालणार नाही. वाढणाऱ्या थकीत कर्जावर व नव्याने थकीत होणाऱ्या कर्जावर विशेष लक्ष ठेवणे आवश्यक आहे. देशस्तरावर झाकोळून आलेले विविध आर्थिक प्रश्न व उशीराने येत असलेल्या मान्सूनमुळे शेती उत्पन्नाबाबत निर्माण झालेली अनिश्चितता याने आपल्या प्रश्नात भर पडत आहे. तथापी मला खात्री आहे की, आपण प्रयत्नात कोठेही कमी पडणार नाही व परिस्थितीवर निश्चित मात करू.

**- अरविंद खळदकर**
**अध्यक्ष**

## लातूर शाखेच्या वतीने अर्थसंकल्प विषयक कार्यक्रम संपन्न




दि. २२/०७/२०१४ रोजी लातूर शाखेच्या वतीने ''केंद्रीय अर्थ संकल्प २०१४-१५'' या विषयावर बँकेचे सह-महाव्यवस्थापक श्री. जयंत काकतकर यांचे जाहीर व्याखान डॉ. भालचंद्र ब्लड बँक, लातूर येथे आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी शाखेचे मान्यवर खातेदार, सभासद, हितचिंतक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सल्लागार समितीचे सदस्य श्री. हुकुमशेठ कलंत्री उपस्थित होते.

प्रारंभी शाखा व्यवस्थापक श्री. चंद्रशेखर साठे यांचे प्रास्ताविक झाले. बँकेचे उप-महाव्यवस्थापक श्री. श्रीराम आपटे यांनी बँकेच्या विविध योजनांची माहिती दिली व त्याचा लाभ घेण्याचे सर्वांना आवाहन केले.

श्री. काकतकर यांनी आपल्या भाषणात अर्थसंकल्पाची अनेकविध वैशिष्ट्ये विषद केली. अर्थसंकल्प तयार करताना कोणकोणत्या गोष्टी विचारात घेतल्या जातात याचा उहापोह केला. अर्थसंकल्पामुळे प्रामुख्याने संरक्षण, विमा व रिअल इस्टेट मधील परकीय गुंतवणुकीची मर्यादा यात वाढ झालेली आहे. त्यामुळे परकीय चलन उपलब्ध होणार आहे. राज्यनिहाय असणाऱ्या वेगवेगळ्या करप्रणालींऐवजी देशभर एकाच प्रकारचा गुडस अँड सर्व्हीसेस टॅक्स पुढील काळात लागू करण्याबाबत सकारात्मक धोरण अवलंबले जाणार आहे.

* ग्रामीण भागाचे विकासासाठी नवीन योजना सरकारने अवलंबिलेल्या आहेत.
* कोणतीही नवीन करवाढ नसल्याने सामान्यांना दिलासा या अर्थसंकल्पातून मिळाला आहे.
* या अर्थ संकल्पातील सर्व तरतूदी पूर्ततेसाठी चांगल्या पावसावर अवलंबून असल्याचे अर्थमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.

अशा अनेकविध बाबींचा परामर्ष आपल्या भाषणात श्री. काकतकर यांनी घेतला.

बँकेच्या या नवीन उपक्रमाबाबत सर्वांनी प्रोत्साहनात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्या तसेच यातून नवीन ग्राहकांचा संपर्क झाल्याने नवीन व्यवसायाच्या संधी मिळाल्या. लातूर शाखेने केलेल्या या उपक्रमाबद्दल विशेष अभिनंदन !!!

# चिंचवडगाव शाखेमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन

## सेमिनार

नॉव्हेल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट व जनता सहकारी बँक लि. पुणे चिंचवडगाव शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५/०४/२०१४ रोजी Recognizing & Responding to emotional distress in Industry या विषयावरील सेमिनार ग्रुप कॅप्टन (रिटायर्ड) श्री. अश्विनी भाकू (VSM) यांनी घेतले.

सदर कार्यक्रमास पिंपरी चिंचवड परिसरातील HR Manager उपस्थित होते. श्री. भाकू यांच्या सेशननंतर मुख्यकचेरी, डेटा सेंटर मधील अधिकारी श्री. आशिष नवरे यांनी बँकेविषयी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे टेक्नोबेस्ड सर्व्हिसेस व इतर योजनांची माहिती दिली. त्यांचेबरोबर शाखेतील सर्व अधिकारी व मुख्यकचेरी मार्केटिंग विभागातील श्री. प्रसाद जोशी हजर होते. शाखेतील सेवक श्री. सुनील गुजराथी व श्री. आनंद काळे यांनी उपस्थितांना बँकेच्या विविध ठेव योजना/म्युच्युअल फंड्स योजना, मॅक्स लाईफ इन्शुरन्स योजनांची माहिती दिली.

नॉव्हेल इन्स्टिट्यूटर्फे श्री. प्रभुणे व श्री. आशिष नवरे यांचा प्रातिनिधीक सत्कार करण्यात आला. आभार प्रदर्शन व भोजनोत्तर कार्यक्रम संपला.

## गुंतवणूक प्रबोधन कार्यक्रम

दिनांक ७ मे २०१४ रोजी शाखेमध्ये गुंतवणूक प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. श्री. राधाकृष्ण लिमये, मार्केटिंग विभाग प्रमुख यांचे हस्ते कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे संदर्भात इन्शुरन्स कंपनीचे तसेच रिलायन्स म्युच्युअल फंड, बिर्ला म्युच्युअल फंडाचे प्रतिनिधी दिवसभर उपस्थित होते.

विविध माध्यमातून एकूण १८००० खातेदारांशी संपर्क करण्यात आला. दिवसभरात शाखेस साधारण ४०० जणांनी भेट दिली. सर्वांना बँकेच्या योजनांबाबत माहिती सांगण्यात आली.

## पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

दि. ०५/०६/२०१४ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शाखेने वृक्षारोपणाचा कार्यक्रम केला.त्याच अनुषंगाने शाखेकडून क्रांतीवीर चाफेकर शाळेला ६ वृक्ष देण्यात आले होते. यादिवशी डॉ. हेडगेवार पुण्यतिथी व क्रांतीवीर दामोदर चाफेकर यांनी २२ जून रोजी रँडचा वध केला त्या स्मृतीप्रित्यर्थ शाखेने प्रभातफेरी व चाफेकर स्मारकास भेट दिली.

श्री. गिरीशजी प्रभुणे यांच्या हस्ते प्रथम वृक्षारोपण करण्यात आले. नंतर शाखेतील श्री. चंद्रशेखर प्रभुणे, श्री. खेडकर, श्री. साठे, श्री. पालेकर, सौ. कुलकर्णी, कु. श्रद्धा जतकर, श्री. जगनाडे, श्री. वाघमारे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमास शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

शाळेचे मुख्याध्यापक श्री. आरेकर यांनी कार्यक्रमाचा उद्देश व पर्यावरणाचे महत्त्व याबाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांचे चिरंजीव ठेव खाते उघडणे बाबत आवाहन केले. ■ ■ ■

# डॉ. मुकुंद जोशी यांचे स्पृहणीय यश

### उत्कृष्ट शोधनिबंध- कोरियामध्ये सन्मान



आपल्या फर्ग्युसन कॉलेज रोड शाखेचे सभासद व प्रसिध्द सर्जन डॉ. मुकुंद जोशी यांनी ११ व्या वर्ल्ड काँग्रेस ऑफ इंटरनॅशनल हेपॅटो-पॅन्क्रिटो-बिलिअरी असोशिएशन (आयएचपीबीए) सेऊल, दक्षिण कोरीया येथे नुकत्याच संपन्न झालेल्या जागतिक परिषदेमध्ये 'सर्जिकल मॅनेजमेंट ऑफ कॉम्प्लीकेशन्स ऑफ पॅन्क्रिएटीक इंडोथेरपी' हा शोध निबंध सादर केला. जगभरातून आलेल्या सर्वोत्कृष्ट निबंध विभागामध्ये त्यांना सादरीकरणासाठी निमंत्रित करुन सन्मानित करण्यात आले.

डॉ. मुकुंद जोशी हे बी. जे. मेडीकल कॉलेज येथे शस्त्रक्रिया विषयाचे सहाय्यक प्राध्यापक, ससून जनरल हॉस्पिटल येथे पदव्युत्तर शिक्षण देणारे प्राध्यापक आणि घोले रोडवरील एम जे एम हॉस्पिटल येथे संचालक म्हणून कार्यरत आहेत. गेली २० वर्षे ते विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया करत असून स्वादुपिंड शस्त्रक्रिया तज्ज्ञ आहेत.

डॉ. जोशी यांच्या सन्मानाचा आम्हाला अत्यंत अभिमान वाटतो. त्यांचे बँकेतर्फे हार्दिक अभिनंदन!

# सेवकांचे अभिनंदन !

आपल्या बाजीराव रोड शाखेतील खातेदार श्री. सुनिल द. जोशी व सौ. रेखा सु. जोशी तसेच श्री. सुरेश ना. कोरडे व सौ. शशिकला सु. कोरडे हे बँकेत आले असता त्यांच्या काही मौल्यवान वस्तू लॉकर बाहेर असल्याचे शाखेतील कर्मचारी श्री. भीमराव म. शिवले, श्री. जनार्दन ल. पोटे, व श्री. आनंद आ. ताडला यांच्या निदर्शनास आले. सदर वस्तू त्यांनी शाखेतील अधिकाऱ्यांचे निदर्शनास आणून संबंधीत खातेदारांना खात्री पटवून देवून त्या परत केल्या त्याबद्दल त्यांचे अभिनंदन! प्रामाणिक सेवकांमुळेच बँकेचे नांव हे जनमानसात उज्ज्वल होत असते व पर्यायाने शाखा व्यवसायात वाढ होते. यापुढे देखील अशाच प्रकारची कामगिरी आपणा सर्वांकडून व्हावी ही सदिच्छा!

# बँकिंग परिक्षांमधील यशाचे मानकरी अभिनंदन !

| | | |
|---|---|---|
| **CAIIB** | | |
| १. श्री. रविशंकर पुरुषोत्तम वाव्हळ. | वरिष्ठ अधिकारी | गिरगाव शाखा. |
| २. श्री. संजय भास्कर आगाशे | कनिष्ठ अधिकारी | स्थावर विभाग. |
| ३. श्री. अभिजीत अरुण जोशी | कनिष्ठ अधिकारी | संगणक विभाग. |
| **JAIIB** | | |
| १. श्री. विनायक विश्वनाथ जोशी | वरिष्ठ अधिकारी | दादर शाखा. |
| २. श्री. राजेश लक्ष्मण देशपांडे | कनिष्ठ अधिकारी | कर्वेनगर शाखा. |
| ३. श्री. दिगंबर दत्तात्रय करमरकर | लेखनिक | शिवाजीनगर (रत्नागिरी) शाखा. |
| ४. श्री. सचिन पुरुषोत्तम पुंडलिक | वरिष्ठ अधिकारी | कर्वेरोड शाखा |
| ५. श्री. दिनेश सदानंद सव्वाशेर | वरिष्ठ अधिकारी | जुन्नर शाखा |
| **DBF (Diploma in Banking & Finance )** | | |
| १. कु. मृणाल सोमनाथ पाटसकर | शिकाऊ लेखनिक | प्रशासन विभाग. |

## औरंगाबाद लायन्स क्लबचे नूतन अध्यक्ष श्री. सीतारामशेठ अगरवाल

आपल्या औरंगाबाद शाखेचे नामवंत खातेदार व सभासद श्री. सीतारामशेठ अगरवाल यांची औरंगाबाद लायन्स क्लबच्या अध्यक्षपदी निवड झालेली आहे. त्यांचा शाखेतर्फे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. श्री. अगरवाल हे ख्यातनाम बिल्डर आहेत.

श्री अगरवाल यांचे बँकेतर्फे हार्दिक अभिनंदन!

## पैठणकर यांचे पदव्युत्तर परिक्षेमधील कौतुकास्पद यश

आपल्या टिळकरोड शाखेतील व्हॅल्युअर श्री. जितेंद्र प्रभाकर पैठणकर यांनी शिवाजी विद्यापीठाच्या (कोल्हापूर) Master of Valuation (Real Estate) या पदव्युत्तर परिक्षेत उत्तीर्ण होऊन प्रथम श्रेणी प्राप्त केली. अशा प्रकारची मास्टर डिग्री परीक्षा संपूर्ण भारतात केवळ गुजरात राज्यातील आणंद विद्यापीठ व महाराष्ट्र राज्यातील शिवाजी विद्यापीठ यांचेमार्फत घेतली जाते.

श्री जितेंद्र पैठणकर यांचे
बँकेतर्फे हार्दिक अभिनंदन !

## अरविंद बापट यांचा पहिला मराठी चित्रपट प्रदर्शित



आपल्या कर्वेनगर शाखेचे सेवक श्री. अरविंद रघुनाथ बापट यांचा पहिला मराठी चित्रपट 'माकडाचं लगीन' हा दिनांक २५ जुलै रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित झाला आहे.

चित्रपट निर्माते अल्ताफ पीरजादे, संतोष निबुदे असून दिग्दर्शक प्रशांत सुर्वे आहेत. श्री अरविंद बापट यांचा हा प्रथम चित्रपट असून या पूर्वी Hospital the cover story आणि 'श्री राजा शाहू छत्रपती' या मालिकांमध्ये त्यांनी अभिनय केला आहे.

श्री. बापट यांची प्रगती गौरवास्पद असून त्यांचा अधिकाधिक उत्कर्ष होवो त्यासाठी बँकेतर्फे त्यांना हार्दिक शुभेच्छा!!

## टिळकरोड शाखेमध्ये चालू ठेव खाते वृध्दी अभियान यशस्वी

दि. १९ मे ते २५ मे या कालावधीत 'चालू ठेव खाते वृद्धी' अभियानाचे आयोजन केले होते. त्यामध्ये खालील चार मुद्यांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले.

१) मागील आर्थिक वर्षात (१३-१४) खाती उघडल्या गेलेल्या खातेदारांकडे संपर्क करणे. २) विद्यमान कॅशक्रेडीट ग्राहकांकडून संदर्भाने खाती मिळवणे. ३) टिळक रोड परिसराची गटांमध्ये विभागणी करून प्रत्यक्ष संपर्क करणे. ४) मागील आर्थिक वर्षात (१३-१४) बंद झालेल्या खात्यांकडे पुन्हा संपर्क करणे

दि. २६ जून २०१४ पर्यंतच्या अभियान कालावधीमध्ये बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंत कुलकर्णी, सह महाव्यवस्थापक श्री. काळे, उपमहाव्यवस्थापक श्री. आपटे आणि मार्केटींग विभागप्रमुख श्री. लिमये यांनी दिलेल्या शाखाभेटींमुळे सेवकांचा उत्साह वृद्धींगत झाला.

दि. २६.०६.२०१४ रोजी सकाळी ९.३० वाजता शाखेमध्ये अभियानाच्या समारोपाचा कार्यक्रम घेण्यात आला. मा.सहमहाव्यवस्थापक श्री. काकतकर यांनी शाखेच्या प्रयत्नांचे कौतुक केले. तसेच या प्रयत्नांचा वेग खंडीत होऊ न देता शाखेच्या प्रस्तावित बचत ठेव वृध्दी अभियानामध्ये वाढ होण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

नमूद कार्यक्रमामध्ये सहाय्यक शाखा व्यवस्थापक श्री. श्रीनिवास खाडिलकर यांनी अभियानाची माहिती दिली तर सहाय्यक शाखा व्यवस्थापक श्री. संजीव आंबेकर यांनी आभार प्रदर्शन केले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भेटी व मार्गदर्शनामुळे सर्व सेवकांना निश्चितच पुढील वाटचालीसाठी पाठबळ मिळाले.

■ ■ ■



बँक सेवा – आपल्या घरापर्यंत!
चित्र : आनंद ताडला

## फर्ग्युसन कॉलेज रोड शाखेने मार्केटिंगसाठी केला विशेष उपक्रम

शाखेमार्फत शनिवार दि. ०५.०७.२०१४ रोजी एफ. सी. रोडवर डेक्कन जिमखाना ते ॲग्रीकल्चर कॉलेज दरम्यान दुकाने, हॉटेल व अन्य व्यावसायिक अशा सर्वांशी शाखेच्या वतीने संपर्क साधण्यात आला. बऱ्याच व्यावसायिकांनी होम सेव्हिंग ठेवी अंतर्गत पैसे देण्याबाबत तयारी दर्शविली आहे. तसेच चालू ठेव व सेव्हिंग ठेवीबाबत देखील चांगला प्रतिसाद दिलेला आहे. त्यासाठी शाखेकडून पाठपुरावा चालू आहे. काही व्यावसायिकांनी त्यांची निकड म्हणून नाणी व सुट्ट्या नोटांबद्दल मागणी केलेली आहे.

जी.एम.आय. गर्ल्स हायस्कूल खडकी येथे शिक्षकांची सभा घेऊन टेक्नोबेस्ड सर्व्हिसेस, रिकरींग व अन्य ठेवींची माहिती शाखेतील अधिकारी श्री. संतोष बाम यांनी दिली. तसेच एटीएम-कम-डेबिट कार्ड चे फॉर्म्स तेथील सर्व शिक्षकांना देण्यात आले.

बी.एम.सी.सी. महाविद्यालयातील कनिष्ठ विभागातील शिक्षक व अन्य सेवकांचे खाती उघडणेसाठी तसेच कनिष्ठ विभागातील फी जमा करणेसाठी लेखी प्रस्ताव दिलेला आहे.

अंकुर विद्यामंदिर येथे शिक्षकांची सभा घेऊन टेक्नोबेस्ड सर्व्हिसेस, रिकरिंग व अन्य ठेवींची माहिती शाखेतील सहाय्यक शाखा व्यवस्थापक श्री. पढार यांनी दिली. त्यांच्या समवेत शाखेचे मार्केटिंग प्रतिनिधी श्री. उदय कुलकर्णी उपस्थित होते.

■ ■ ■

## शाखा वर्धापनदिनाच्या शुभेच्छा !



- ✻ जालना रोड, औरंगाबाद...... दि. १९ ऑगस्ट २०१३
- ✻ बोरिवली, मुंबई.............. दि. २५ ऑगस्ट २०१३
- ✻ घाटकोपर, मुंबई.............. दि. २५ ऑगस्ट २०१३
- ✻ चंदननगर, पुणे................ दि. २६ ऑगस्ट २०१३
- ✻ सहकारनगर, पुणे............ दि. २७ सप्टेंबर १९६२



# Cyber Crime

Crime is a very common word that we always hear in this era of globalization. Crime refers to any type of violation of law. Crime and criminality have been associated with society since ages. Cyber crime is a new type of crime that occurs in this era of science and technology. There are a lot of definations




for cyber crime. In simple words Cyber crime is an unlawful act where computer is used either as a tool or a target or both. Cyber crime involves criminal activities that are theft, defamation, forgery, misappropriation, fraud, abuse etc.

In India, Information Technology Act 2000 (IT Act) came into force on 17th October 2000. Information Technology Act 2000 contain provisions related to legal recognition for electronic documents, legal recognition of digital signatures, Offenses and contraventions and Justice dispensation systems for cyber crimes. In view of IT Act 2000, various amendments have been incorporated in other acts like Indian Penal Code , Indian Evidence Act 1872, Bankers' Books of Evidence Act 1891, Reserve Bank of India Act 1934.

## Types of cyber crimes are

| | |
|---|---|
| 1. Financial Crimes | 12. Data Diddling |
| 2. Cyber Pornography | 13. Salami Attacks |
| 3. Sale of Illegal Articles | 14. Denial of Service Attack |
| 4. Online Gambling | 15. Virus / Worm Attacks |
| 5. Intellectual Property Crimes | 16. Trojans and Keyloggers |
| 6. Email Spoofing | 17. Internet Time Theft |
| 7. Forgery | 18. Web Jacking |
| 8. Cyber Defamation | 19. Email frauds |
| 9. Cyber Stalking | 20. Cyber Terrorism |
| 10. Web Defacement | 21. Use of encryption by terrorists |
| 11. Email Bombing | |

The first report by Ultrascan Advanced Global Investigations, shows that Online scams and frauds have targeted and defrauded many Indians into losing upto $0.87 billion to the scamsters in the year 2013. It is not possible to calculate the true real social and financial impact of cyber crimes. This is because the most of the crimes don't get reported.

India was fourth in the list of countries which were monetarily most affected by cyber crimes. First was the US at $2.3 Billion, followed by China ($1.7 Billion) and third place was the UK ($1.2 Billion). India was the fourth worst affected in spite of minimum internet usage in the country as compared to other countries in the list. If this trend continues, with rising internet users, the number of Indian victims of such crimes will rise with a greater speed. People in India are not that much aware of computer and / or not taking necessary precautions to avoid cyber crimes.

In the recent BRICS summit in Brazil, Hon. Prime Minister Shri. Narendra Modi, has raised the issue of cyber crime too, in the context of overall security.

Indian government as well as other countries are taking various measures to prevent cyber crimes. It's not only government's duty to prevent cyber crimes but also every individual who use Computer and computer network is responsible. Everyone should be educated with what are cyber crimes and do's and don'ts about the usage of computer and computer network.

We will discuss cyber crime details in the next issue.

**Ashish Naware - IT Department**

■ ■ ■

## माहे जून व जुलै २०१४ मध्ये निवृत्त झालेले सेवक

| | | |
|---|---|---|
| श्री. चंद्रकांत कस्तुरप्पा कडगंची | शिवाजीनगर, पुणे | वरिष्ठ अधिकारी |
| श्री. श्रीकांत सोमेश्वर देशपांडे | सेंट्रलाईज्ड सेल | वरिष्ठ अधिकारी |
| श्री. दत्तात्रय मल्हारी हाडके | बाजीराव रोड | लेखनिक |
| श्री. गणेश धुंडीराज मराठे | बाजीराव रोड | लेखनिक |
| श्री. शिरीष भालचंद्र शेपाळ | विलेपार्ले | लेखनिक |
| श्री. संजय बाळकृष्ण पाटील | फोर्ट | लेखनिक |
| श्री. नारायण काशिनाथ अभंग | बाणेर | लेखनिक |
| श्री. बबन नामदेव गायकवाड | कर्वेनगर | शिपाई |

**पुढील आयुष्यात आपल्याला उदंड सौख्य व निरामय दीर्घायुष्य लाभो !!**

## लगे रहो, बच्चों !

आपल्या बँकेतील कर्मचाऱ्यांच्या इयत्ता १२ वी, १० वी मधील यशस्वी व इयत्ता ४ थी व ७ वी मधील शिष्यवृत्ती प्राप्त केलेल्या पाल्यांचे हार्दिक अभिनंदन !

मुलांनो, असेच यश
मिळवत रहा,
उज्ज्वल भारताचे
शिल्पकार बना !



# लॉकर्सची थकबाकी वसूली व अपडेशन : अत्यंत महत्वाचे काम

बाजीराव रोड शाखेत एकूण २०६५ लॉकर्स आहेत. त्यात कुमठेकर रोडची ३४८ लॉकर्स आहेत. दरवर्षी लॉकर थकबाकी योग्य मिळत नव्हती. कारण संपूर्ण लॉकरची खाती त्यानंतर त्यानंतर संगणकीकृत केली गेली नव्हती. त्यामुळे लॉकर्स कागदपत्रे अद्ययावत करणे, प्रत्यक्ष लॉकर संख्या, संगणक लॉकर संख्या व लेजर लॉकर संख्या यांचा ताळमेळ लावून योग्य त्या दुरुस्त्या करून थकबाकी वसूल करण्याची योजना शाखेने केली.

प्रथम लॉकर्सची प्रत्यक्ष खाते संख्या काढण्यासाठी वेगवेगळ्या कागदावर लॉकर्स कॅबिनेट प्रमाणे, साईज प्रमाणे चार्ट करून त्यावर लॉकर क्रमांक देऊन लॉकरची खाते संख्या साईजप्रमाणे काढली. त्यानंतर लेजरची खाती व संगणकातील खाती तपासली जी खाती लेजरला आहेत, पण संगणकात नाहीत अशी खाती संगणकात योग्य त्या पद्धतीने उघडून घेतली. जी खाती लेजरमध्ये बंद झाली होती परंतु संगणकात बंद झाली नव्हती ती संगणकात बंद करून घेतली. त्यानंतर शिल्लक लॉकर्सच्या किल्ल्या तपासून त्या संगणक व लेजरप्रमाणे खात्री करून रिकामे लॉकर्सची संख्या काढली. या पद्धतीने संगणक व लेजर यातील खाते संख्या जुळवून घेतली.

थकबाकी संगणकामध्ये येण्यासाठी लॉकर रेंट ड्यू डेट ही १ एप्रिल अशी करावी लागणार होती. त्यासाठी डेटा सेंटरची मदत घेतली. त्यानंतर लॉकर्स मोड्युलमध्ये ड्यू डेट बदलण्याचा मोड करून दिला. त्याप्रमाणे सर्व लॉकर्स खात्याची थकबाकीप्रमाणे रेंट ड्यू डेट बदलली. त्यामुळे लॉकर्सची थकबाकी ही आर्थिक वर्षाप्रमाणे मिळाली. बँकेच्या नियमाप्रमाणे लॉकर भाडे हे १ ते १० एप्रिल दरम्यान आले पाहिजे, अन्यथा उशीरा येणाऱ्या लॉकर्स भाड्याला दंड घेतला जातो; लॉकर रेंट ड्यू डेट बदलल्यामुळे दंड आकारणे सोपे झाले.

लॉकर्स भाडे सेव्हिंग खात्यातून S.I. प्रमाणे घेतले जात नव्हते. त्याची योग्य ती दुरुस्ती संगणकातील नोंदीमध्ये केली. त्यामुळे बऱ्याच खात्याची वसुली झाली.

संगणकामधील ओपन ऑफिस स्प्रेड शीट मधे लॉकरधारकांची सर्व माहिती भरली याला 'जनरल इंडेक्स्' असे नाव दिले. या जनरल इंडेक्स्मुळे के.वाय.सी., लॉकर्स क्रमांक, लॉकर्स प्रकार, खाते क्रमांक, लॉकर्स किल्ली क्रमांक शोधणे सोपे व जलद झाले.

संगणकामध्ये सेव्हिंग खात्याप्रमाणे लॉकरधारकांच्या सह्या लॉकर्स मोड्युलमध्ये स्कॅन केल्या. त्यामुळे लॉकरधारकांच्या सह्या त्वरीत पाहता येऊ लागल्या.

वरील सर्व बदल केल्यामुळे रु. १० लाख इतकी थकबाकी वसूल झाली. त्यापैकी रू. ७५,०००/- इतकी बुडीत थकबाकी वसूल करण्यात यश आले.

वरील सर्व प्रकारच्या प्रयत्नांमुळे, बदलांमुळे खालील फायदे झाले व यापुढे होणारे नुकसान हे फायद्यात बदलता आले.

१) सर्व लॉकर्स खात्यांच्या रेंट ड्युडेट बदलल्यामुळे बँकेला एकरकमी लॉकरभाडे वसूल करता येते व ती रक्कम दुसरीकडे गुंतवणूकीसाठी उपलब्ध होते.

२) बँकेच्या नियमाप्रमाणे भाडे १ ते १० एप्रिल नंतर आल्यास दंड आकारणे सोयीचे झाले. २०१३-२०१४ या वर्षात शाखेला रु. ४२,०००/- इतकी रक्कम दंडापोटी मिळाली.

३) जी रक्कम बँकेला भाड्यापोटी टप्या-टप्याने मिळत होती, ती रक्कम रेंट ड्यू डेट बदलल्यामुळे एप्रिल महिन्यातच मिळाली.

# लातूर शाखेचा उपक्रम - डॉक्टर्स डे

दिनांक १ जुलै २०१४ रोजी डॉक्टर्स डे निमित्त शहरातील सर्व डॉक्टर्सना प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा देण्याचा विशेष उपक्रम लातूर शाखेने केला. त्यासाठी विशेष शुभेच्छा पत्र तयार करण्यात आले होते. डॉक्टर्सना शुभेच्छा पत्र, गुलाब पुष्प व पेढा देण्यात आला.

१ जुलै रोजी सर्वश्री चंद्रशेखर साठे, श्री. भगवान व शाखेतील अन्य सेवक यांनी विवेकानंद हॉस्पिटलमध्ये जाऊन मा. डॉ. अशोकराव कुकडेकाका यांचा शाल, श्रीफळ, विशेष शुभेच्छा पत्र, पुष्पगुच्छ, पेढा देऊन सत्कार केला व या कार्यक्रमाची सुरुवात केली. काकांनी सदर कार्यक्रमाचे विशेष कौतुक केले. तसेच विवेकानंद हॉस्पिटल मधील ४० डॉक्टरांचा देखील सत्कार करण्यात आला.

शाखेतील अन्य सेवकांनी त्यांना ठरवून दिलेल्या विभागात जाऊन सर्व डॉक्टरांची प्रत्यक्ष भेट घेऊन शुभेच्छा दिल्या.

सर्व डॉक्टर्सना बँकेच्या योजना व टेक्नोबेस्ड सुविधांची माहिती देण्यात आली. सदर उपक्रमादरम्यान डॉक्टर्सनी उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिल्या. त्यांना बँकेचा सदर उपक्रम खूप आवडला.

भेटीदरम्यान काही डॉक्टर्सनी अशा भावना व्यक्त केल्या की, आमच्या व्यवसायामध्ये शुभेच्छा देण्यासाठी कोणी येत नाही आणि एखाद्या व्यक्तीस काही त्रास होत असेल तरच येतो परंतु जनता बँकेने डॉक्टर्स डे ची आठवण ठेवून आवर्जून सर्व डॉक्टर्सना शुभेच्छा दिल्या त्याबद्दल धन्यवाद दिले.

दिनांक ३० जून हा तिमाहीअखेर असल्याने दिनांक १ जुलै रोजी दैनंदिन कामकाज जास्ती असून सुद्धा शाखेत कामकाज करणारे सेवक व बाहेर शुभेच्छा देण्यासाठी जाणारे सेवक अशी व्यवस्थित विभागणी करून शाखेचे कामकाजही सुरळीत पार पडले व डॉक्टर्स डे यशस्वी केला.

लातूर शाखेतील सर्व सेवकांचे मन:पूर्वक कौतुक व अभिनंदन!

■■■

## लघु उद्योग भारती परिषद २०१४

लघु उद्योग भारती ही संस्था २० वर्षापासून कार्यरत असून, त्यांचा मुख्य उद्देश लघु उद्योगांना चालना मिळावी व आपल्या देशातील बेरोजगारांना रोजगार मिळावा हा आहे. अशा लघु उद्योगांच्या समस्या व अडचण सोडविण्यासाठी व विविध नियमांचा जाचक त्रास न होण्यासाठी संपूर्ण भारतातील लघु उद्योगांना एकत्रित करून त्यांचे प्रश्न सोडविण्याचे काम या संस्थेमार्फत होते.

या वर्षी या संस्थेची २२वी वार्षिक सर्वसाधारण सभा बी.एम.सी.सी. कॉलेज, पुणे येथे दि. १० व ११ मे रोजी पार पडली. या सभेस महाराष्ट्रातून तसेच संपूर्ण भारतातूनही अंदाजे २०० लघु उद्योजक उपस्थित होते. अशा ठिकाणी आपल्या बँकेची जाहिरात व्हावी यासाठी बँकेने सदर परिषदेचे प्रायोजकत्व स्वीकारले होते.

आपली बँक जास्तीत जास्त लघु उद्योजकांपर्यंत पोहोचावी यासाठी बँकेच्या एफ. सी. रोड शाखेचे शाखाव्यवस्थापक व सेवकांनी या परिषदेच्या ठिकाणी जाऊन बँकेची माहिती या संस्थेच्या सभासदांना दिली.

■■■

# विलेपार्ले शाखेमध्ये लक्षवेधी उपक्रम

## गुरुपौर्णिमा स्नेहमिलन वृत्तांत

विलेपार्ले शाखेमध्ये गुरुपौर्णिमा दिवसाचे औचित्य साधून विलेपार्ले परिसरातील ज्यांनी आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे अशा काही निवडक मान्यवर व्यक्तींचे स्नेहमिलन दि. १२/०७/२०१४ रोजी आयोजित करण्यात आले होते.

मुंबईतील काही सहकारी बँकांवर शासकीय कारवाई व आर्थिक निर्बंध आल्याने व त्या बँकांच्या शाखा विलेपार्ले परिसरात असल्याने, लोकांमध्ये अनेक अफवा पसरल्या. त्यामुळे पार्ल्यातील प्रतिष्ठीत व्यक्तींना चहापानाला बोलावून बँकेची आर्थिक स्थिती व आकडेवारी त्यांच्यापर्यंत पोहचवावी असाही उद्देश सदर स्नेहमिलनाचा होता.

शाखाव्यवस्थापक श्री. राजीव बर्वे आणि कनिष्ठ अधिकारी श्री. शैलेश घोसाळकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सदर स्नेहमिलनास बँकेचे मुंबईस्थित संचालक श्री. अतुल बेडेकर व स्थानिक सल्लागार समिती सदस्य श्री. अभय द. बापट उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांमध्ये सौ. कविता रेगे, श्रीमती अनुराधाताई गोरे, श्री. मोहनराव आपटे, श्री. सुहास बहुलकर, सौ. शुभदा वाघ, सौ. शिल्पा अभ्यंकर, सौ. साधना सप्रे, श्री. रविंद्रपाल शर्मा, श्री. रविंद्र नाईक, सौ. आशा खाडिलकर, श्री. माधवराव खाडिलकर, श्री. प्रदीप भिडे, श्री. नामजोशी उपस्थित होते. मान्यवरांचे श्री. बेडेकर साहेबांच्या हस्ते पुष्पगुच्छ, पेढा व आदरभाव व्यक्त करणारे शुभेच्छापत्र देवून सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमास बँकेचे ऑडिटर व शाखेतील मान्यवर खातेदार श्री. मुकुंदराव चितळे यांची विशेष उपस्थिती होती.

■ ■ ■

## ‘अभिनंदन पत्र’ व ‘चिरंजीव ठेव खाते’ संदर्भात कार्यक्रम वृत्तांत

शाखेतील ग्राहकवर्गामध्ये नवीन पिढी व तरूणांचा समावेश व सहभाग वाढावा या दृष्टीने पार्ले परिसरातील शाळांमध्ये जाऊन या वर्षी १० वी ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना गुणपत्रिका वाटपाच्या वेळी बँकेतर्फे त्यांचे अभिनंदन व पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देणारे पत्र देण्यात आले.

शाखाव्यवस्थापक यांनी स्वत: व शाखेतील कनिष्ठ अधिकारी श्री. शैलेश घोसाळकर यांनी परिसरातील मोठ्या तीन शाळा ज्यांचा ठेवी, पगार या निमित्ताने शाळेशी आधीपासून बँकेचा संबंध प्रस्थापित आहे. अशा

१) विलेपार्ले महिला संघ २) एअरपोर्ट ॲथोरीटी सिव्हल एव्हीएशन स्कूल ३) पार्ले टिळक शाळा यांच्या मुख्याध्यापक व शाळेचे विश्‍वस्त यांच्या भेटी घेतल्या. एकूण ४७० विद्यार्थ्यांना १० वीच्या निकालासोबत ‘अभिनंदन पत्र’ वाटप करण्यात आले. व ‘चिरंजीव ठेव योजनेची’ माहिती देण्यात आली.

■ ■ ■

# व्यवसाय वाढीसाठी बोरिवली शाखेचा अभिनव उपक्रम

बोरिवली येथील ज्येष्ठ नागरीक संघाच्या मासिक सभेमध्ये आपल्या बँकेने सहभाग घेतला. शनिवार दि. २८/६/२०१४ रोजी बोरिवलीतील प्रार्थनालय येथे ज्या सभासदांचे वाढदिवस होते त्या प्रत्येक सभासदाला आपल्या बँकेच्या वतीने एक ग्रीटींग कार्ड, पुष्पगुच्छ व जनता बँक असे लिहीलेले पेन भेट म्हणून दिले.

बोरिवली शाखा व्यवस्थापक श्री. रवींद्र लिमये यांच्या हस्ते सदर भेटवस्तू दिल्या. त्यानंतर श्री. रवींद्र लिमये यांनी आपल्या बँकेची थोडक्यात माहिती सभासदांना सांगितली. त्यानंतर समारोप करतांना श्री. गुजराथीसरांनी म्हटले की, ‘‘ही माझ्या विद्यार्थ्यांची बँक आहे. बँकेचा व्याजदर अतिशय चांगला आहे. ब्रँच अद्ययावत तंत्रज्ञानाने युक्त आहे. तरी आपल्या सभासदांनी ब्रँचला जरूर भेट द्यावी’’ असे कार्यक्रमामध्ये आवाहन केले.

शाखाव्यवस्थापक श्री. रवींद्र लिमये व बोरिवली शाखा मार्केटिंग प्रतिनिधी श्री. श्रीनिवास लिमये यांनी सभासदांना प्रत्यक्ष भेटून बँकेबाबत अधिक माहिती सांगितली. तसेच श्री. अनुज मेहता व सौ. उमा कलबुर्गी यांनी सर्व सभासदांना आपल्या बँकेची माहितीपत्रके दिली. कार्यक्रमाला २०० पेक्षा अधिक सभासदांची उपस्थिती होती.

■ ■ ■

# Wi-Fi नेटवर्किंग म्हणजे काय ?



वाय-फाय हे सध्या प्रचलित असलेले एक महत्वाचे गतीमान तंत्रज्ञान आहे. ज्यात संगणक आणि इंटरनेटसाठी लागणारे जाळे कोणत्याही वायरचा वापर न करता रेडीओलहरींच्या माध्यमातून विणले जाते.

जेव्हा रेडीओलहरींद्वारा मायक्रोवेव्हज्, वायरलेस राऊटर, वायरलेस ॲडॉप्टर वापरून इंटरनेट आणि संगणकाचे जाळे विणले जाते तेव्हा त्याला वायरलेस किंवा वाय-फाय म्हणतात. वाय-फाय (Wi-Fi) म्हणजे Wireless Fidelity असा समज अनेकांचा असतो. परंतु हे बरोबर नसून वाय-फाय अलायन्स हा संस्थेचा रजिस्टर टेडमार्क असलेल्या IEEE ८०२.११ दर्जाच्या उपकरणांनी कोणतीही वायर प्रत्यक्षात न वापरता केवळ रेडीओलहरींद्वारा संदेश व माहितीचे दळणवळण होते. त्यातील ॲक्सेस पॉइंट हा संकेत हा देवाणघेवाण करण्याचा प्रमुख कार्यबिंदू असतो.

**तंत्रज्ञान काम कसे करते ?**

१. संगणकाचा वायरलेस ॲडॉप्टर रेडीओ ध्वनिलहरी ॲन्टेनांच्या मार्फत संदेशवहन होते.

२. वायरलेस राऊटर संदेशाचे रूपांतर करतो आणि इंटरनेट कनेक्शनद्वारा संदेश संगणक वापर कर्त्यांपर्यंत पोचवितो. हीच प्रक्रिया संगणक वापरकर्ता ते मुख्य संगणक अशा दोन्ही बाजूंनी होऊन माहितीची देवाणघेवाण चालू राहते.

**वाय-फाय चे फायदे**

घरी बसून संगणकाद्वारा अभ्यास, शिक्षण, व्यावसायिक कामे, बँकिंग, जनसंपर्क अशा अनेक गोष्टी सहज शक्य होतात.

श्री. अनिरूध्द श्रीधर पळशीकर
M.I.S. Dept, H.O.

■ ■ ■

# आरोग्यावर बोलू काही – भाग २

## आयुर्वेद प्रत्येकाकरिता!

श्री. वैद्य विनायक खडीवाले

**१. केस :** वडाच्या पारंब्याप्रमाणे बळकट व भुंग्यांच्या वर्णाप्रमाणे काळ्याभोर केसांकरिता वडाच्या पारंब्या, कोरफड, आवळ्यांचा रस, माका, नागरमोथा ही पाच औषधे तेल तयार करण्याकरता उपयोगी आहेत. पोटात घेण्यासासाठी आरोग्यवर्धिनी सकाळी व सायंकाळी तीन गोळ्या व रसायन चूर्ण सकाळी एक चमचा तीन महिने पर्यंत घ्यावे.

**२. कान :** कानाचे म्हणजे कफांचे विकार त्रास देऊ नयेत म्हणून वाहता कान व बहिरेपणा याकरिता आरोग्यवर्धिनी, पुनर्नवा मंडूर व लाक्षादि गुग्गुळ प्रत्येकी तीन अशा नऊ गोळ्या दोन वेळा घ्याव्यात.

**३. डोळे :** वाढता व अकाली चष्म्याचा नंबर जाण्याकरिता आरोग्यवर्धिनी तीन गोळ्या व सोबत महात्रैफलघृत दोन चमचे, तूप व अर्धा चमचा मधाबरोबर रात्री झोपताना घ्यावे. थोड्याशाही वाचनाने डोळ्यांना थकवा येत असल्यास, मौत्तिक भस्म हरभऱ्याच्या डाळीएवढे सकाळी सायंकाळी दुधाबरोबर घ्यावे.

**४. दात :** लहान बालकांचे दात किडके असल्यास नवीन चांगले दात यावे म्हणून चोपचिन्यादि चूर्ण एक अष्टमांश चमचा किंवा दोन वालाएवढे सकाळी व सायंकाळी तीन महिनेपर्यंत द्यावे.

**५. मेंदूचे किंवा मतिमंद विकार :** वयाच्या मानाने अर्धा किंवा एक बदाम रात्री भिजत टाकून सकाळी उगाळून वाटून घ्यावा. यापेक्षा अधिक देऊ नये. ब्राह्मीवटी दोन ते तीन गोळ्या वयाच्या मानाने सकाळी व सायंकाळी द्याव्या. सुवर्णाची बारीक तार व वेखंडाची कांडी मधात उगाळून ते चाटण सकाळी व सायंकाळी द्यावे. सोन्याची अंगठी दोन कप पाण्यात उकळून एक कप पाणी आटवून ते पाणी प्यावयास द्यावे. अपस्मार (फिट्स येणे) या विकारात विशेष उपयोगी आहे.

**६. हाडे :** ठिसूळ व कमी वाढ असलेली हाडे मजबूत व्हावी म्हणून सांबरशिंग पाण्यात उगाळून त्याचे चमचाभर दाट गंध लहान अर्भकास द्यावे. मोठ्या बालकांकरिता व इतरांना शृंग भस्म व लाक्षादि गुग्गुळ प्रत्येकी तीन गोळ्या सकाळ – सायंकाळी द्याव्यात.

तारुण्य म्हणजे मूर्तिमंत उत्साह आणि जोष, काही कारणाने या गोष्टींना उतरती कळा लागली की, तारुण्यालाही उतरती कळा लागली असं मानलं जातं.

शक्तिवर्धके हा यावर एक उपाय असतो. अर्थात त्याला व्यायाम, योग्य आहार व विहार आणि विश्रांती यांची जोड द्यायला हवी.

आता आणखी काही शक्तिवर्धके पाहू.

**स्वर :** भसाडा आवाज, स्वरभंग, आवाज बसणे याकरिता एलादि वटी सहा ते आठ गोळ्या दिवसभरात चघळाव्यात. वासापाक तीन चमचे दोन वेळा घ्यावा किंवा अडुळशाच्या पानांचा रस दोन दोन चमचे मधाबरोबर घ्यावा. भरपूर मनुका चावून खाव्यात.

**प्राणवह, स्त्रोतस, फुफ्फुस व कफाचे विकार :** चौसष्ट पिंपळीचूर्ण शेंगदाण्याएवढे मधाबरोबर चाटण करावे. लहान बालकाला चांगली लेंडी पिंपळी लहान प्रमाणात मधाबरोबर उगाळून चाटवावी. दीर्घकाळचा दमा, कफ असणाऱ्यांनी एक ते दोन लेंडी पिंपळ्या, एक कप दूध व एक कप पाणी यांचे मिश्रण उकळवून, आटवून एक कप दूध उरवून द्यावे. पुदिना, आले, लसूण ओली हळद यांची चाटणी खावी, सांबरशिंग उगाळून लहान बालकाला द्यावे. मोठ्यांकरिता फुफ्फुसाचे बल वाढावयास शृंगभस्म तीन गोळ्या दिवसातून दोन वेळा द्याव्यात. निवडुंगाची पिकलेली बोंडे फुफाट्यावर भाजून, त्याचा काढलेला रस बालकांकरिता फुफ्फुस विकारांत मोठेच टॉनिक आहे.

**स्नायू :** स्नायू बळकट होण्याकरिता शतावरी घृत सकाळ-सायंकाळ दोन चमचे द्यावे. शतावरी सिद्ध तेलाने किंवा महानारायण तेलाने मसाज सकाळ-संध्याकाळ करावा. शतावरी घृत घेऊ न शकणाऱ्यांनी शतावरी कल्प एक ते दोन चमचे दुधातून घ्यावे. किंवा एक चमचा शतावरी चूर्ण एक चमचा तुपावर भाजून, एक कप दूध व पाण्यात शिजवून, योग्य ती साखर मिसळून त्याची लापशी घ्यावी.

क्रमश:

## बाजीराव रोड शाखेमध्ये शिक्षकांसाठी बँक योजनांचा परिचय

दि. १२/०७/२०१४ रोजी गुरु पूजनाच्या कार्यक्रमाचे निमित्त साधून ज्या शाळांची वेतन खाती शाखेत आहेत अशा १) हुजूरपागा २) सेवा सदन ३) भावे हायस्कूल ४) रेणुका स्वरुप ५) गोपाळ हायस्कूल ६) सराफ हायस्कूल ७) सरस्वती हायस्कूल या सर्व शाळांशी संपर्क साधून दि. १४/०७/२०१४ रोजी या सर्व शाळांमधील मा. मुख्याध्यापक, उप. मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, हेड क्लार्क, सर्व शिक्षकवर्ग उपस्थित होते.

मा. श्री. ज. पु. कश्यप, श्री. पत्की, श्री. कुंभार यांनी सर्व गुरुजनांचे स्वागत करून आपल्या बँकेचा परिचय करून दिला त्याच प्रमाणे बँकेने नव्याने सुरुवात केलेल्या विविध सुविधांबाबत माहिती दिली. सदर कार्यक्रमास बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंतराव कुलकर्णी उपस्थित होते. त्यांनी आपल्या बँकेची स्थिती, बँकेने संगणक क्षेत्रात केलेली प्रगती, ग्राहकांना योग्य वेळेत आणि उत्तम सेवा देण्याबाबत बँक नेहमी आग्रही असल्याचे सांगितले.

उपस्थित शिक्षकांच्या प्रश्नांना श्री. कश्यप यांनी उत्तरे देवून त्यांचे शंका समाधान केले. बँकेच्या कामात कोणत्याही प्रकारची अडचण आल्यास त्या अडचणीचे पूर्णपणे निरसन तातडीने केले जाईल याबाबत आश्वासन दिले.

## बाजीराव रोड शाखेचा उपक्रम गुरुपौर्णिमेनिमित्त शालेय विद्यार्थ्यांना बँक योजनांची माहिती

दिनांक १२ जुलै २०१४ रोजी गुरुपौर्णिमेनिमित्त गोपाळ हायस्कूल मध्ये बाजीरावरोड शाखेतील श्री. विजय कदम, श्री. अभय ढमाले व श्री. महेश खरे उपस्थित होते. श्री. कदम यांनी विद्यार्थ्यांना गोष्ट सांगितली. बचतीचे महत्व व आर्थिक नियोजन या विषयी मार्गदर्शन केले व चिरंजीव ठेव तसेच शुभाषिश ठेव योजनेत खाते उघडण्याचा आग्रह केला.

रामकृष्णमठातील मूक-बधिर विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या शिक्षिकांना ठेवी व कर्जाची माहिती देण्यात आली. कार्यक्रम संपल्यानंतर सर्व शिक्षक व कार्यालयातील सेवकांची बैठक घेण्यात आली.

# गुंतवणूक करताना कोणत्या दक्षता घ्याव्यात ? काय खबरदारी घ्यावी?

हल्लीच्या काळात आर्थिक फसवणुकीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढलेले दिसून येते. यामध्ये सरकारी यंत्रणेचा चुकीच्या पद्धतीने वापर करून अथवा दुरुपयोग करून नवनवीन मार्गाने सामान्य जनतेला फसवण्याचे प्रकार सुरू झाले आहेत. दिशाभूल करणाऱ्या जाहिराती, आकर्षक रचना व मोठमोठाली आकर्षक ऑफिस इमारती, त्यातील सुट बुट घातलेले व फाडफाड इंग्लिश बोलणारे तरुण , तरुणी या मुळे सामान्य व आर्थिकदृष्ट्या निरक्षर असणारे अनेक सुशिक्षित आपली जीवनभरची कमाई चुकीच्या ठिकाणी गुंतवून नुकसान ओढवून घेतात. अशा प्रकारे झालेल्या नुकसानीचे पुढेपुढे नैराश्यात रुपांतर होवून आत्महत्येचे प्रकारही घडतात.

कितीही कायदे कानून केले अथवा कितीही लोकांना केलेल्या गुन्ह्याबद्दल शिक्षा केली तरी गुन्हे होण्याचे थांबणार नाही फारतर गुन्हे होण्याचे प्रमाण कमी होवू शकेल परंतु या पासून सुटका मिळविण्याचा अथवा वाचण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे गुंतवणूक करताना पूर्ण माहिती घेवून गुंतवणूक करावी अथवा आर्थिक क्षेत्रातील व आपल्या विश्वासातील, माहितीतील व्यक्तींचा सल्ला घ्यावा आणि मगच गुंतवणूक करावी. असे असले तरी काही सामान्य बाबींची जुजबी चौकशी करून आपणही प्रत्यक्ष खातरजमा करू शकतो. त्या बाबी पुढीलप्रमाणे :

- सर्वप्रथम हे लक्षात ठेवले पाहिजे की, कोणतीही गुंतवणूक एक अथवा दोन वर्षात दुप्पट होवू शकत नाही, असे असते तर देशातील सर्व उद्योगपती, कारखानदार व्यावसायिक यांनी स्वत:चे व्यवसाय बंद करून तेथेच गुंतवणूक केली असती. वास्तविक आपल्यालाही हे माहिती असते परंतु, त्यावेळी आपल्यातील लालूच जागी होवून जास्त फायदा मिळेल या खोट्या आशेने आपण बळी पडतो. सबब, आपल्यातील लालूच जागी होणार नाही याची दक्षता घ्या.
- ज्या संस्थेत आपण गुंतवणूक करतो त्या संस्थेचा संपूर्ण इतिहास जाणून घ्या, त्या संस्थेची सध्याच्या आर्थिक परिस्थितीची माहिती घ्या, ही माहिती घेताना ती कोणी माहिती दिली हे तपासा, अनेक वेळा वृत्तपत्रामधील जाहिराती, कंपन्यांनी छापलेली आकर्षक ब्रोशर, मोठे कार्यक्रम या माहितीवर विसंबून गुंतवणूक केली जाते त्या ऐवजी त्या संस्थेचे वार्षिक अहवाल, अन्य सरकारी दस्तावेज पाहून खात्री करावी.
- गुंतवणूक करत असलेली योजना ही कायदेशीर आहे का? याची माहिती घ्यावी. मनी सर्क्युलेशन स्कीम इत्यादी सारख्या योजना मध्ये पैसे गुंतवू नये.
- गुंतवणुकीला मिळत असलेला परतावा हा अवास्तव, साधारण बाजारभावापेक्षा खूपच जास्त असा तर नाहीना याची खात्री करावी, अशा योजना या फसव्या असतात. नुकत्याच काही संस्थांनी मोठ्या प्रमाणावर अशा योजनांमध्ये गैरव्यवहार केल्याचे दिसून येते.
- गुंतवणूक करताना आपली आजची क्षमता आणि भविष्यकाळातील गरज, भविष्य काळातील आपण केलेले वायदे या बाबी विचारात घेवून योग्य तेवढीच गुंतवणूक करावी आणि त्यानुसारच योग्य गुंतवणूक योजनेची निवड करावी.
- सदा सर्वदा एकाच प्रकारच्या योजनेमध्ये अथवा एकाच ठिकाणी गुंतवणूक करू नये. वेगवेगळे पर्याय निवडावेत.
- गुंतवणूक करताना जर एखाद्या मध्यस्था मार्फत गुंतवणूक करणार असल्यास प्रथम त्याचेकडून लेखी प्रस्तावाची मागणी करावी,त्याची सर्व बाजूने शहानिशा करावी. वेळप्रसंगी त्या संस्थेत समक्ष भेटून अथवा फोन करून खातरजमा करावी.
- गुंतवणूक केल्यानंतर मिळणारी सर्टिफिकेट अथवा स्टेटमेंट बारकाईने तपासून पहावी, नांव, रक्कम, मुदत, व्याजदर या बाबी ठरल्यानुसार दिलेल्या असल्याची खातरजमा करावी. अनेक वेळा या मध्ये ठरल्यानुसार नसते विसंगती असते.
- गुंतवणूक करतानाच गुंतवणुकीतून बाहेर पडण्याचे मार्ग कोणते आहेत याचीही माहिती घ्यावी त्या गुंतवणुकी तारण देता येतात का? त्यावर कर्ज घेता येते का ? मोडल्यास किती नुकसान होते याची माहिती घेवून ठेवावी म्हणजे अचानक उद्भवलेल्या अडचणीच्या काळात काही निर्णय घ्यावयाचा असल्यास त्याला उशीर होणार नाही.

अशा प्रकारे गुंतवणूक करताना लोभ न ठेवल्यास व विचारपूर्वक गुंतवणूक केली, तर आपल्या गुंतवणुकीला निश्चितच योग्य परतावा मिळेल शिवाय गुंतवणुकीचे मुद्दलही सही सलामत मिळेल या बाबत कोणतीही शंका बाळगण्याचे कारण नाही.

६५ वर्षांची परंपरा, विशिष्ट विचारांचा वारसा,पारदर्शी,नि:स्वार्थी संचालक, संयमी भागधारक आणि प्रामाणिक सेवक या जनता बँकेकडे असलेल्या बाबी वरील मानकांवर, कसोट्यांवर पूर्ण उतरतात हे वेगळे नमूद करायला नको.

**श्री. ज. पु. कश्यप – बाजीराव रोड शाखा**

# बाजीरावरोड शाखेत होम सेव्हींग्ज ठेव योजनेचा उपक्रम

छोटे विक्रेते पथारीवाले, हातगाडीधारक, दुकानदार यांचेकडून दैनंदिन स्वरुपात ठराविक रक्कम जमा करून भविष्यात त्याचे रुपांतर मोठ्या ठेवीत होते. यासाठी शाखेने १२ मे २०१४ रोजी होम सेव्हींग्ज ठेव योजना सुरू केली. शाखेच्या सभोवतालच्या परिसरात अनेक छोटे विक्रेते, व्यापारी तसेच तुळशीबागेत असणारे पथारीवाले यांच्याकडे बँकेचा प्रतिनिधी रोज गेल्यास होम सेव्हींग्ज खाती भरपूर प्रमाणांत उघडण्यात येतील. पर्यायाने शाखेला लो कॉस्ट ठेवी मोठ्या प्रमाणावर मिळण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर अशा ग्राहकांसाठी ग्राहक मेळावा घ्यावा हे ठरविण्यात आले.

शाखेच्या वतीने ३ जून २०१४ रोजी होम सेव्हिंग्ज खातेदार व परिसरातील छोटे व्यापारी, पथारीवाले, हातगाडीवाले व मार्केटमधील व्यापारी यांना आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरवात श्री. नितीन पंडित यांनी लक्ष्मी देवीच्या प्रतिमेला हार घालून केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वागत व सूत्रसंचालन श्री. पराग ठाकूर यांनी केले. सह-शाखाव्यवस्थापक श्री. कुंभार यांनी स्लाईड शोद्वारे बँकेची माहिती उपस्थितांना सांगितली. त्यानंतर होम सेव्हींग्ज तसेच कर्जविषयी व ठेवी यांची माहिती श्री. संजय खांडजकर यांनी दिली. कार्यक्रमास उपस्थित ग्राहकांचे शंका व प्रश्नांची उत्तरे शाखाव्यवस्थापक श्री. जगदीश कश्यप यांनी दिली.

गरुड झेप

गरूड झेप ही गृहपत्रिका केवळ खाजगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही.
गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क करावा.
दूरध्वनी : ०२०-२४४५०५४०, मो. नं. ९९७०८००३४८. संपादकीय समन्वय : भालचंद्र कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी (मोबा. : ९८२२८८२५०९)